# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

## नागपूर मेट्रो स्टेशनवर दिव्यांगांसाठी विशेष सुविधा

## प्रवास सुलभीकरणाचा नवा मानांक आदर्श



नागपूर – झपाट्याने होत असलेल्या नागरी विकास आणि आधुनिकीकरणासाठी ओळखले जाणारे शहर म्हणजे नागपूर. 'नागपूर मेट्रो'च्या माध्यमातून अपंगत्व असलेल्या प्रवाशांसाठी सुलभतेचा एक अनुकरणीय आदर्श निर्माण करत आहे. नागपूर मेट्रो केवळ दैनंदिन प्रवाशांच्या गरजा पूर्ण करत नाही, तर विशेष प्रवाशांनाही सन्मान, आराम आणि निर्बंधमुक्त प्रवासाची हमी देते. गेल्या वर्षभरात नागपूर मेट्रोने २,२२२ विशेष प्रवाशांना मदत केली असून, त्यांना आंतरराष्ट्रीय सुलभता मानकांशी सुसंगत, सर्वसमावेशक आणि आनंदी प्रवासाचा अनुभव दिला आहे. हे यश केवळ पायाभूत सुविधा नव्हे, तर मानवी संवेदनशीलतेचा आणि सामाजिक समावेशाचा उत्तम नमुना म्हणूनही ओळखले जात आहे.

नागपूर मेट्रोची वैशिष्ट्ये

२०१९ मध्ये उद्‌घाटन झालेली नागपूर मेट्रो ही एक अत्याधुनिक, पर्यावरणपूरक आणि विश्वासार्ह नागरी वाहतूक प्रणाली आहे. नागरी वाहतूक कोंडी कमी करणे, प्रदूषणाला आळा घालणे आणि नागरिकांना जलद, सुरक्षित व परवडणारे प्रवास साधन उपलब्ध करून देणे, हे या प्रकल्पामागील प्रमुख उद्दिष्ट आहे. ही प्रणाली दोन मुख्य मार्गांवर कार्यरत आहे: ॲणक्का लाईन (उत्तर-दक्षिण) आणि ऑरेंज लाईन (पूर्व-पश्चिम). या दोन्ही मार्गांची एकूण लांबी ४० किमी आहे आणि ते शहरातील प्रमुख व्यापारी, निवासी व औद्योगिक भागांना एकमेकांशी जोडतात. नागपूर मेट्रोच्या माध्यमातून प्रवाशांना केवळ वेळेची बचत होत नाही, तर एक अधिक सुसंस्कृत, स्वच्छ आणि स्मार्ट प्रवासाचा अनुभव देखील मिळतो.

**विशेष प्रवाशांसाठी संपूर्ण सहाय्य**

नागपूर मेट्रो ही केवळ प्रवासाचे साधन नाही, तर सर्वसमावेशकतेचा एक जिवंत नमुना आहे. ही प्रणाली प्रत्येक नागरिकासाठी; विशेषतः दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक आणि इतर गरजूंना सहज, सुलभ आणि सन्मानपूर्वक वापरता येईल, यासाठी सज्ज करण्यात आली आहे. विशेष प्रवाशांच्या गरजांचा सखोल विचार करून सुलभ पायाभूत सुविधा आणि सहाय्यक सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत.

**विशेष प्रवाशांसाठी नागपूर मेट्रोच्या सुविधांची रूपरेषा यात समाविष्ट आहे :**

**१. व्हीलचेअर उपलब्धता :**

सर्व मेट्रो स्थानकांवर व्हीलचेअर्स उपलब्ध करून देण्यात आले असून, त्यामुळे हालचालीत अडचण असलेल्या प्रवाशांना ट्रेनमध्ये चढणे व उतरणे अधिक सुलभ झाले आहे. महत्त्वाच्या ठिकाणी प्रशिक्षित कर्मचारी तैनात असून, ते प्रवास सुकर व्हावा यासाठी आवश्यक सहाय्य प्रदान करतात.

**२. दृष्टिहीन प्रवाशांसाठी टॅक्टाइल मार्ग :**

स्थानकांमध्ये स्पर्शसंवेद्य टॅक्टाइल पट्ट्यांची रचना करण्यात आली आहे. हे मार्गदर्शक पट्टे दृष्टिहीन प्रवाशांना प्रवेशद्वारापासून प्लॅटफॉर्मपर्यंत सुरक्षित आणि आत्मविश्वासाने चालण्यास मदत करतात.

**३. व्हीलचेअर वापरणाऱ्यांसाठी राखीव जागा :**

प्रत्येक मेट्रो डब्यात व्हीलचेअर वापरणाऱ्यांसाठी खास डिझाइन केलेल्या आणि सहज प्रवेशयोग्य राखीव जागा उपलब्ध आहेत, ज्यामुळे त्यांचा प्रवास अधिक आरामदायक आणि सुरक्षित होतो.

**४. विशेष सहाय्य सेवा**

प्रत्येक स्थानकावर विशेष प्रशिक्षित कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. हे कर्मचारी विशेष प्रवाशांना चढण्या-उतरण्याच्या प्रक्रियेसह इतर वैयक्तिक गरजांमध्ये त्वरित व संवेदनशील सहाय्य देतात.

**५. रॅम्प्स आणि एलिव्हेटर्स**

सर्व मेट्रो स्थानकांमध्ये सुलभ चढ-उतारासाठी रॅम्प्स आणि लिफ्ट्स बसविण्यात आल्या आहेत. या सुविधा नियमितपणे तपासल्या जातात आणि सुलभतेचे उच्च मानक कायम राखले जाते.

**६. आपत्कालीन सहाय्य व सूचना प्रणाली**

प्रत्येक ट्रेन आणि स्थानकात आपत्कालीन संप्रेषण प्रणाली बसविण्यात आली आहे. या प्रणालीद्वारे प्रवासी तात्काळ मदत मागवू शकतात. याशिवाय दृक-श्राव्य स्वरूपात आपत्कालीन सूचना पुरवल्या जातात.

**आकडेवारीतून दिसणारी बांधिलकी :-**

गेल्या वर्षभरात नागपूर मेट्रोने २,२२२ विशेष प्रवाशांना मदत केली आहे. ही आकडेवारी केवळ एक संख्या नसून, नागपूर मेट्रोने निर्माण केलेल्या सुलभ आणि समावेशक पायाभूत सुविधांचा स्वीकार प्रवाशांनी मोठ्या प्रमाणात केला असल्याचे स्पष्ट दर्शवते. विशेष प्रवाशांच्या संख्येमधील वाढ ही नागपूर मेट्रोने घेतलेल्या सामाजिक बांधिलकीची साक्ष आहे. समतेच्या दिशेने पडलेले हे एक महत्त्वाचे पाऊल.

**भविष्याकडे दृष्टी :-**

नागपूर मेट्रोचा समावेशक दृष्टीकोन हा देशातील इतर सार्वजनिक वाहतूक व्यवस्थांसाठी एक अनुकरणीय आदर्श ठरतो आहे. विविध समाजघटकांच्या गरजांचा विचार करून विकसित केलेल्या अत्याधुनिक सुविधांमुळे नागपूर मेट्रोने प्रवास केवळ सुलभ नव्हे, तर सर्वसमावेशक व सन्माननीय बनवला आहे.

हा दृष्टिकोन भारत सरकारच्या 'दिव्यांग व्यक्ती हक्क कायदा, २०१६' च्या संकल्पनांशी सुसंगत असून, सर्वांसाठी अडथळामुक्त आणि समतोल सार्वजनिक अवकाश निर्माण करण्याच्या राष्ट्रीय उद्दिष्टाला भक्कम पाठिंबा देतो. नागपूर मेट्रो केवळ प्रवासाची सुविधा न राहता, एक सामाजिक परिवर्तनाचा वाहक ठरतो आहे — जिथे प्रत्येक प्रवासी, कोणत्याही शारीरिक क्षमतेचा असो, सन्मानाने आणि आत्मविश्वासाने प्रवास करू शकतो.



